# एकनाथी भागवताआधी रचलेला गोमंतकीय ग्रंथ - *श्रीकृष्णचरित्रकथा*

## श्रीमद्भागवत

पुरूषोत्तम कृष्ण यांचे ‘श्रीमद्भगवद्गीता आणि श्रीमद्भागवत’ असे दोन उपदेश ग्रंथ आजही जगाला मार्गदर्शन करत आहेत. जगात कसे जगावे? हे श्रीकृष्णाने भगवद्गीतेच्या माध्यमाने अर्जुनाला सांगितले. तसेच आपण कसे जगलो? हे श्रीमद्भागवताच्या माध्यमाने उध्दवाला सांगितले. म्हणजे नंदनंदन कृष्णाने आपले जीवनानुभव सांगण्यासाठी महाभारत काळातील फक्त दोनच व्यक्तिंना निवडले. पहिला पराक्रमी धनूर्धर पार्थ, तर दुसरा भक्तोत्तम उध्दव, या दोघानांच त्यांनी स्वानुभवाचे बोल सांगितले. गीतेत जीवनाचे तत्वज्ञान आहे, तर भागवतात श्रीकृष्ण जीवनाचे कथन आहे.

## ग्रंथावतार

‘श्रीमद्भागवत’ हा श्रीकृष्णांचा ‘ग्रंथावतार’ मानला गेला आहे. इदं भागवतं नाम पुराणं ब्रम्हसम्मितम् l उत्तम श्लोक चरितं चकार भगवानृषिः lनिःश्रेयसाय लोकस्य धन्यं स्वस्त्ययनं महत् ll (१.३.४०) अर्थ : ‘हे श्रीमद्भागवत्पुराण म्हणजे भगवंताचा वाङ्मयीन अवतार आहे. त्याची रचना भगवत् व्यासांनी केली आहे. सर्व लोकांचे परम कल्याण हाच या व्यासरचित ग्रंथाचा उद्देश आहे. जो सर्वथा यशस्वी आहे,पूर्ण आनंदमय आणि परिपूर्ण आहे.’ (श्रीमद्भागवत प्रथम स्कंध, तिसरा अध्याय, चाळीसावा श्लोक.) अशाच आशयाचा श्लोक चैतन्य भागवत या ग्रंथात आहे. कृष्णतुल्य भागवत् -विभुःसर्वश्रय प्रतिश्लोके प्रति अक्षरे नाना अर्थकह ll (चैतन्य भागवत,२४.३१८) अर्थ :सर्व जीवांचे आश्रय करणाऱ्या सर्वोच्य भगवंतासम श्रीमद्भागवत ग्रंथ महान आहे. या भागवतातील प्रत्येक श्लोक, प्रत्येक अक्षरांत अनेक अर्थ दडलेले आहेत.

## भागवतातही राधा नाही

श्रीमद्भगवद् गीतेत १८ अध्याय आहेत. तसेच श्रीमद्भागवत ग्रंथात १२ स्कंध आहेत. या पैकी दहाव्या स्कंधात संपूर्ण ग्रंथाचे सार आहे. पूर्ण पुरूषोत्तम भगवान श्रीकृष्णचे चरित्र कथन केले आहे. बाललिला, रासक्रिडा, कंस चाणूर वध इत्यादी पराक्रमांचे वर्णन त्यात आहे. श्रीकृष्ण जन्म ते कंसवधापर्यंतचा जीवनक्रम या स्कंधात आहे. महत्वाचे म्हणजे ज्या राधेचा कृष्णाबरोबर जयजयकार केला जातो. तिचा उल्लेख संपूर्ण महाभारतात, भगवद्गीतेत व भागवतातही कोठेच नाही. जयदेवांच्या ‘*गीतगोविंद*’ या काव्य कल्पनेतून ही ‘आ’राधिका अवतरली आहे.

## ग्रंथाधार भागवत

श्रीमद्भागवताच्या या दहाव्या स्कंधावर आधारीत कृष्णदास शामांनी श्रीकृष्णचरित्र कथा या ग्रंथाची निर्मिती केली आहे. तर संत एकनाथांनी भागवताच्या अकराव्या स्कंधावर आधारीत एकनाथी भागवत या ग्रंथाची रचना केली आहे. तत्कालीन समाजाला पथदर्शन करण्याचे कार्य या दोन्ही ग्रंथांनी केले.

## दोन्ही ग्रंथकारांचा परिचय

संतपदाला पोचलेले एकनाथ महाराज हे संताच्या मांदियाळीतील एक अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून प्रसिध्द आहे. त्यांनी एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, चतुःश्लोकी भागवत, रूक्मिणी स्वयंवर इत्यादी ग्रंथ रचना केली. तसेच नामदेव, गोराकुंभार, चोखामेळा, दामाजी, सांवता माळी या संतांची चरित्रे लिहिलीत. तसेच त्यांनी ध्रुव, प्रल्हाद, सुदामा इत्यादी भक्तांचीही चरित्रे लिहिली आहेत. गौळणी, विराण्या, भारूड इत्यादी वाङ्मय प्रकारही त्यांनी हाताळले आहेत. नाथ रचित *‘त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ll’* ही श्रीगुरू दत्तात्रेयाची आरती आणि *‘ओंवाळू आरती मदन गोपाळा ll’* श्रीकृष्णाची आरती आजही समाजात प्रचलीत आहे. त्यांच्या एकनाथी भागवत या ग्रंथाला भागवत संप्रदायात फार महत्वाचे स्थान आहे.

कृष्णदास शामा हे गोमंतकातील पहिले ज्ञात मराठी ग्रंथकार होय. त्यांचे खरे नांव सामराज असून कृष्णदास ही त्यांनी स्वताः स्विकारलेली नाममुद्रा आहे. ते कौशिक गोत्री असल्याचे त्यांनी आपल्या श्रीकृष्ण चरित्रकथा या ग्रंथात नमूद केले आहे. हा ग्रंथ मूळ ‘कांदणी’ म्हणजे हळेकन्नड लिपी मध्ये लिहिला आहे. गोव्यातील मडगांव शहराजवळ वसलेल्या केळोशी येथील शांतादुर्गेच्या सान्निध्यात ही ग्रंथ रचना आपण केली असल्याचे ग्रंथकाराने सांगितले आहे.

## नाथभागवता आधी रचली कृष्णकथा

श्रीराम पांडुरंग कामत संपादीत मराठी विश्वचरित्र कोशा नुसार ‘शामराजांनी एकनाथांपूर्वी सुमारे पन्नास वर्षे आणि ज्ञानेश्वरानंतर अडीचशें वर्षे या काळात जी ग्रंथभाषा महाराष्ट्रात प्रचलित होती त्या भाषेत शामराजांनी आपली ग्रंथरचना केली आहे. पोर्तुगीज राजवटीत या ग्रंथांचे परदेशी भाषांमधून पुन्हा मराठीत भाषांतर करण्यात आले.

**ज्ञानीयाचा एका**

भगवद्गीतेवर ज्ञानदेवीच्या निमित्ताने ज्ञानदेवांनी भाष्य केले. तर श्रीमद्‌भागवत या ग्रंथा आधारे संत एकनाथांनी एकनाथी भागवताची रचना केली. ह.श्री.शेणोलीकर यांच्यामते 'ज्ञानेश्वरीच्या संशोधन संपादनाने पाठशुध्द प्रत तयार करण्याचा आदर्श एकनाथांनी घालून दिला. ज्ञानेशांच्या विचारसरणिची व विवेचन पध्दतीची छाप नाथभागवतावर सर्वत्र पडलेली आहे. दोहोंमध्ये असंख्य साम्य स्थळे आहे. मंगलाचरणे, गुरूवंदने, गुरूवरील रूपके, श्रोत्यांची प्रार्थनां, मराठीचा कैवार, ग्रंथकर्तृत्वाबद्दल विनयोद्‌गाराबरोबर निघणारे आत्मविश्वासाचे बोल, भक्त भगवंत यांच्यातील प्रेमाचे वर्णन, भवसागर, कर्मनदी, मायानदी यांसारखी रूपके विस्तारणे या सर्व बाबतीत नाथांनी ज्ञानेशांच्या पावलावर पाऊल ठेवले आहे. त्या दृष्टीने ज्ञानेश्वरी अ.७(महानदीचे रूपक) आणि एकनथी भागवत अ.२ मधील भवसागराचे रूपक व अ.११ मधील कर्म नदीचे रूपक यांची तुलना करण्यासारखी आहे. कृष्णा-अर्जून प्रेमभावाचे वर्णन व कृष्ण उध्दव यांचे प्रेम भेटीचे नाथांनी केलेले वर्णन यातील आत्यंतीक साम्य एवढे एकच उदाहरण वरील मुद्यांच्या समर्थनासाठी पुरेशे आहे. या वर्णनात केवळ प्रसंगांचे व कल्पनांचे साम्य आहे, असेच नाही तर शब्द योजनेचेही साम्य किती आहे, हे पुढील एकाच ओविच्या तुलनेने स्पष्ट होईल.

*हृदया हृदय येक जाले । ये हृदयींचे ते हृदयी घातले ।*
*द्वैत न मोडिता केले । आपणा ऐसे अर्जूना ।।* (ज्ञा.अ.१८-१४२१)

आणि

*हृदयी हृदया एक जाहले । ये हृदयीचे ते हृदयी घातीले ।।*
*कृष्ण सर्वस्व जे आपुले । ते हृदयी सुदले उध्दवाचे ।।* (नाथ भागवत अ.१९-३०)

म्हणून भागवत संप्रयदायामध्ये 'ज्ञानीयाचा एका' ही म्हण का प्रचलीत झाली असावी, याचे उत्तर येथे मिळते.

**कृष्णदासाचा क्रिस्तदास**

ज्या पध्दतीने एकनाथी भागवतावर ज्ञानेश्वरीचा प्रभाव जाणवतो, तसा कृष्णदास शामा यांच्या श्रीकृष्णचरित्र कथेवर दुसऱ्या कोणत्याच ग्रंथाचा प्रभाव जाणवत नाही. या उलट गोव्यात आलेल्या अनेक कॅथलिक मिशनऱ्यांनी आपल्या ग्रंथाची रचना करताना श्रीकृष्णचरित्र कथेचा अभ्यास केला होता. वि.भा.प्रभुदेसाई यांच्या मतानुसार 'गोमंतकात वास्तव्य करून मराठी पुराणांची रचना करणाऱ्या फादर स्टिफन्स, पाद्री एतीयंत-द-ला-क्रुवा, पाद्री आंतोनियो-द-साल्दांज इत्यादी परदेशी व परभाषिक मिशनऱ्यांनी स्वतःच्या काव्यात अनुकरण व अवहेलना करण्यासाठी म्हणून जे पुराण ग्रंथ आपल्या समोर ठेवले होते. त्यामध्ये कृष्णदास शामांच्या श्रीकृष्णचरित्र कथेला अग्रस्थान दिल्याचे पुरावे आढळतात.

'कृष्णदास' या कवी नाममुद्रेचे अनुकरण करून फा. स्टिफन्स आपल्या क्रिस्तपुराणात स्वतःला 'क्रिस्तदास' म्हणवतो. अध्यायांना कृष्णकथे प्रमाणे अवस्वरू म्हणतो. इतकेच नव्हे तर त्यांच्या ओव्यांचे अनुकरणही फादर स्टिफन्स यांनी अनेक ठिकाणी केल्याचे दिसून येते.उदा.

*जैसे सीव्हाचे तान्हे। धावते गजावरी ।।* (श्रीकृष्णचरित्र कथा १६.१४)
*जैसा सिंहाचा ताना । जाये गाजाथे धाऊन ।।* (क्रिस्तपुराण १.२४.८५)

या ठिकाणी कृष्णदास शामांच्या कृष्णभक्तीचे तसेच त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्या ऐवजी स्टिफन्सनी त्यांच्या वाङ्‌मयीन वैशिष्ट्यांचे अनुकरण केल्याचे दिसून येते.

**दोन्ही ग्रंथ लेखनाची कारणे सारखी**

कृष्णभक्ती ही नाथ भागवत आणि कृष्णकथा या दोन्ही ग्रंथांची प्राणशक्ती आहे. दोन्ही ग्रंथामध्ये रौद्र, करुण, शृंगारादी नऊ रस आहेत, शब्द-अर्थालंकारांचे भांडार आहेत. दोन्ही ग्रंथ लेखना मागची मुख्य कारणे सारखी आहेत. सुखलालसा, विषय-वासनेकडे मानवी मनाची नैसर्गिक ओढ असते. असे चंचल 'मन' देवाला नमन करायला, नामस्मरण करायला वळत नाही. मनाचे दमन करणेही 'स्फोटक' ठरू शकते. अशा मनाला आवडेल, रूचेल पचेल अशा पध्दतीने हरिकथा निरूपण करणे हे समयोचित कार्य असते. संत एकनाथ आणि कृष्णदास शामा यांनी 'श्रीहरीभक्ती' समाजासमोर शब्दार्थ अलंकार आणि नऊ रसांनी शुगर कोटिंग करून ग्रंथ रूपाने मांडली. भगवद्‌भक्तीला प्राधान्य देऊन मनोरंजन करतांना आत्मरंजन व समाज प्रबोधन करणे, हे दोन्ही ग्रंथ निर्मितिचे समान मुख्य कारण आहे, असे मला वाटते.

**उद्देश मात्र भिन्न आहेत**

समाजात कृष्ण भक्तीचे बीजारोपण करणे, एवढाच कृष्णदासांचा उद्देश आहे. तर नाथांच्या ग्रंथाचा उद्देश भक्तीबरोबरच समाज पुरुष सुखी, समृध्द आणि सक्षम व्हावा, हा आहे.त्यासाठी दोन्ही ग्रंथकार लोकांना सरळ उपदेश न करता ग्रंथातील व्यक्तिरेखांच्या माध्यमाने करतात.

**अभ्यासकांच्या मते एकनाथी भागवत**

द.वि.कुलकर्णी यांनी आपल्या 'एकनाथी भागवताचा अभ्यास' या पुस्तकात श्री एकनाथी भागवताचा पंचमपुरुषार्थ ग्रंथ असा उल्लेख (पृ.५७) केला आहे. 'एकनाथ दर्शन (खंड२पृ.३४) यातील श्री घाटे यांच्या मतानुसार 'एकनाथी भागवतात सर्वत्र भिन्नभिन्न साधनांचा समन्वय उत्कृष्टपणे साधला आहे. ज्ञान, कर्म, भक्ती, विवेक, वैराग्य, योग तपादी साधनांचे स्वतंत्र महत्व तेथे तेथे प्रतिपादले असून त्यांचा परस्पर एक वाक्यतेचा संबंध दिसून येतो. श्रीनाथ भागवतात सर्व प्रतिपादन विपूल केले असूनही कर्मठतेचा दुराग्रह नाही. तसेच आत्मज्ञानाचे महत्व सर्वत्र अनेक उपपत्तींच्या द्वारे सिध्द केले असून वृथा ज्ञानाभिमान नाही. भक्तिरस हा या ग्रंथाचा स्थायीभाव आहे. पण प्रतिपादिलेली भक्ति अंध नसून पूर्ण डोळस आहे. ''

*माया म्हणजे भगवत शक्ती l भगवतभजने तिची निवृत्ती।।*
*आन उपाय तेथे न चालती l भक्त सुखे तरती हरिमाया ।।* (अ.२.ओ.५७)

असे आध्यात्मिक ज्ञान नाथांच्या भागवतात आहे. तसे देह विज्ञानही आहे. उदा. *'जैसे केळीचे अधोमुख कमळl तैसे हृदय कमळ।।,'* ही हृदयाला दिलेली उपमा विलक्षण आहे. यावरून त्यांचे सुक्ष्म निरिक्षण जाणवते. तसेच

*पक्षिणीची अपक्ष पिले l ती तिसीच स्मरती सर्वकाळे ।।*
*तेवी जागृती स्वप्न सुषुप्ती मिळे l जो गुरू वेगळे स्मरेना ।।* (अ.१२-९८)

ही ओवीही नाथांचे पांडित्य प्रतिभा आणि निरक्षण किमया दर्शवणारी आहे.

**अभ्यासकांच्यामते श्रीकृष्ण चरित्रकथा**

गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास (खंड पहिला पृ.९८) या पुस्तकातील 'गोमंतकाची मराठी परंपरा' या डॉ. वि.बा.प्रभूदेसाई यांच्या मतानुसार ''शामराज उर्फ कृष्णदास शामा या गोमंतकीय कवीची गोमंतकातच उपलब्ध झालेली 'श्रीकृष्ण चरित्रकथा' ही संस्कृत भागवताधारे रचिलेली मराठी टिका (इ.स.१५२६) शके १४४८ मधील म्हणजे एकनाथांच्या भगवतावरील सुप्रसिध्द टीकेच्या (इ.स.१५७३) बरीच आधीची आहे. या वास्तवाची प्राचीन मराठी वाङ्मयेतिहासकारांना आवर्जुन दखल घेतल्याशिवाय गत्यंतर नाही.''

**कृष्ण कथेतील काव्यसौंदर्य**

*'ओवी' छंद गोविंदाचा*

ओवी व अभंग हे मराठीतील सर्वात जुने व परंपरेने चालत आलेले असे लोकप्रिय छंद आहेत. ओवीला चार चरण असतात. पहिल्या *तीन चरणांत चौथ्या चरणातील अक्षरांपेक्षा अधिक अक्षरे असतात.* व चौथ्या चरणात पहिल्या तीन चरणांतील अक्षरांपेक्षा कमी अक्षरे असतात. (सुगम मराठी व्याकरण लेखन-मो.रा.वाळंबे १६६). संत ज्ञानेश्वर रामदासाप्रमाणे संत एकनाथ व कृष्णदास शामांनीही आपापल्या ग्रंथात 'ओवी' छंदानेच गोविंदाचे गुणगान केले आहे. मराठी भाषेच्या भांडारातील शब्दालंकारांनी व अर्थालंकारांनी हे ग्रंथ सुशोभित झाले आहेत. रसाळ, वाचनीय व श्रवणीय झाले अहेत. श्रीकृष्णचरित्र कथेत भाषेचे काव्यसौंदर्य अलंकार यांची विलोभनिय रचना आहे.

**भाषेचे 'अलंकार '**

अलंकार या शब्दाचा अर्थ 'दागिना' असा आहे. दागिने घातल्याने माणसाच्या शरीराला शोभा येते. त्याच्या सौंदर्यात भर पडते. जी गोष्ट व्यक्तिची तीच भाषेची. आपली भाषा अधिक परिणामकारक किंवा चांगली दिसावी म्हणून, नेहमीची साधी भाषा न वापरता आपण वेगळ्याच पध्दतीने सादर करुन, ती अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न करतो.त्यातूनच विविध शब्द-अर्थ अलंकार मनमोहक आकार घेऊ लागतात. 'आकर्षती चित्तः इति कृष्णः।'असा शामकृष्ण जिचा नायक ती श्रीकृष्णकथा आधीच सुमधूर शांती व परमानंद प्रदान करणारी वाङ्मयसुधा आहे. जी कृष्णदास शामांनी भाषा अलंकारांनी उत्तम प्रकारे सजवली व श्रवणरम्य बनवली. श्रीकृष्णचरित्र कथेत विविध पध्दतीने साकार होणारे हे भाषालंकार मनोरम आहेतच, त्याच बरोबर अनमोलही आहेत.

***शब्दालंकार***

१.*अनुप्रास :* एखादी ओळ वाचतांना एखादे अक्षर पुन्हा पुन्हा आल्यामुळे जो नाद निर्माण होता, त्यामुळे काव्याला शोभा येते. एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन, त्यातील नादामुळे जेव्हा त्याला सौंदर्य प्राप्त होते, तेव्हा अनुप्रास हा अलंकार होतो.

*सुवर्णमणीयांची माळा । दो मणिया माजी एक निळा ।*
*तैसा गोपीका माजी कृष्ण सावळा । शोभता झाला ।।१४-७४।।*
*ऐशा गोपिका रमारमे । रमविल्या तेणे रामे ।*
*आपुलेने संभ्रमे । करोनिया ।।१४-९६।।*

श्रीकृष्ण चरित्रकथेत अशा या ओव्यांतून रामकृष्ण हरीची ऐक्यता दिसून येते व अक्षरांच्या पुनरावृत्तीमुळे नादमधूर्य ही जाणवते. अनुप्रास या शब्दालंकाराचे हेच वैशिष्ट्य आहे.

२. *यमक* : श्रीकृष्ण चरित्रकथा आणि एकनाथी भागवत दोन्ही ग्रंथ ओवीबध्द आहेत. ओवी या छंदानुसार पहिल्या तीन चरणांच्या शेवटी यमक असते. कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी, एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अर्थाने आल्यास 'यमक' हा अलंकार होतो. दोन्ही ग्रंथ यमकालंकाराने समृध्द आहेत. प्रत्येक ओवीतून तो साकारतांना दिसतो. उदा.

*वाचे बोलीजे कीर्तन । मनि किजे ध्यान ।।*
*नयेनि पाहिजे वदन । रूप तुझे ।।७-९।।*

या ओवीतील पहिल्या तीन चरणांशेवटी असलेल्या कीर्तन, ध्यान, वंदन या शब्दांच्या शेवटच्या 'न' या अक्षराच्या माध्यमाने 'यमक' हा अलंकार साकारला आहे. या ओवीचे आणखीन एक वैशिष्ठ्य म्हणजे एकनाथ पूर्व कृष्णदास शामांच्या काळातही गोव्यात कीर्तन परंपरा अस्तित्वात होती, हे ही स्पष्ट होते. भगवतात नवविधाभक्तीचे वर्णन केले आहे. त्यापैकी श्रवण, स्मरण यांचा समन्वय सधणाऱ्या कीर्तनभक्ती विषयी शामराज म्हणतात...

*श्रवण, स्मरण कीर्तन। नवविद्या भक्तिचे गुण ।*
*ते तरावया कारण । प्राणियाते ।।३-४१।।*

**अर्थालंकार**

*१. उपमा :* दोन वस्तूंतील साम्य चमत्कृतीपूर्ण रीतिने जेथे वर्णन केलेले असते, तेथे उपमा हा अलंकार होतो. उपमेत एक वस्तू दुसऱ्या वस्तू सारखी आहे असे वर्णन असते. उपमेचे चार घटक असतात.

उपमेय (ज्याची तुलना करायची ते)
उपमान (ज्याच्याशी तुलना करावयाची ते)
साधारण धर्म (दोहोतील सारखेपणा)
साम्यवाचक शब्द (सारखेपणा दाखिविणारे शब्द)

सारखेपणा दाखवण्या करता उपमा अलंकारात 'सारखा, जसा, जेवी, सम, सदृश गत, परी, समान, सारखे' यांसारखे साम्य वाचक शब्द येतात. श्रीकृष्णकथेत कृष्णदासांनी संपूर्ण ग्रंथात अशा अनेक कल्पनारम्य उपमा उत्तम रितीने पेरल्या आहेत. उदा.

*तेज प्रकासले दाहिदिशी । जैसा सूर्य बुदेला आकाशी ।।*
*तैशा वासुदेवाच्या गृहासी । शोभते झाले ।।३-३४ ।।*

या ठिकाणी कृष्णाला सूर्याची उपमा दिली आहे.

*मेघे आच्छादिले अंबर । जैसे माया ब्रम्ह निर्विकार ।*
*बेडूक शेब्द करीती थोर । विप्रवेद जैसा ।।१०-६४ ।।*

या ओवीत जसे सनातन ब्रह्म चैतन्यावर मायेचे आवरण आहे, तसे आकाशात मेघ जमून एक प्रकारचे आवरणच तयार झाले आहे. तर ब्राह्मण जसे वेदमंत्रपाठ करतात, तसे बेडूक पावसाळ्यात आवाज करतात. महत्वाचे म्हणजे ज्यावेळी 'रूद्रपाठ' म्हटला जातो तेव्हा या बेडकांच्या 'डराव-डराव'ची आठवण येते. 'रूद्रपठण' ऐकून याची अनुभूती घेण्यास हरकत नाही.

*२. रूपक :* उपमेय आणि उपमान यात एकरूपता आहे. ते भिन्न नाहीत, असे वर्णन जेथे असते, तेथे रूपक हा अलंकार जाणवतो. उदा.

*हा मृत्यूचा म्हणीयारा । जाहला पर्वताकार थोर ।*
*तरी श्रीकृष्ण आमुचा वज्र हतियेरा । पाठी असे ।।७-१०३।।* (अघासूर)
*काळसर्प वीखाहरू । पाठी लागला संसारू ।*
*पळता देता नाभिकारू । पारि कवण नाही ।।३-११९।।*

पहिल्या ओवीत पर्वतकार दैत्याला मारणारा श्रीकृष्ण म्हणजे वज्रच होय. तर दुसऱ्या ओवीत संसार आपल्या पाठीमागे लागलेला काळसर्प आहे. या ठिकाणी उपमेय आणि उपमान यांची एकरूपता दिसून येते. हेच रूपक होय.

***३. व्यतिरेक :*** उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे, असे वर्णन केले असेल तर व्यतिरेक हा अलंकार होतो. श्रीकृष्ण चरित्र कथेत हा अलंकार पुढील ओवित दिसून येतो.

*जे स्वयं ज्योती सनातन । ज्याचेनी चंद्र सूर्य जाण ।*
*अग्नी आणि तारांगण । प्रकाशती ।।१२-१९४।।*

म्हणजे अग्नी, चंद्र सूर्य तारांगणांना यशोदानंदन कृष्ण प्रकाशमान करतो.

*वज्रा होऊन कठीण । ज्याचे शरीर जाण ।*
*त्याचेनि मशक केवी प्राण । घेवू अके ।।९.८७।।*

***४. भ्रांतीमान :*** उपमानाच्या जागी उपमेयच आहे, असा भ्रम निर्माण होऊन तशी काही कृती घडली, तर तेथे भ्रांतीमान अलंकार असतो. कृष्ण कथेत हा अलंकार नसला तरी त्याची उणिव भरून काढणाऱ्या ओव्या आहेत. उदा.

*भासल्या मृगजळा । जळ ऐसे दीसे डोळा ।*
*परी पाहू गेलेया जवळा । काहीच नाही ।।११ -१०१।।*
*दोरिये सर्प भासिला । तैसा भ्रांती जेवोनी उठला ।*
*तैसा साक्षात्कारे नाथीला । जीयेवरी ।*

या ठिकाणी मृगजळाला पाणी तर दोरीला साप समजण्याचा भ्रम निर्माण झाल्याने या ओवीत भ्रांतीमान अलंकारासारखे एक वेगळेच रूप दिसून येते.

***५. अतिशयोक्ती :*** कोणतीही कल्पना, आहे त्यापेक्षा खूप फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितलेली असते. त्यावेळी अतिशोक्ती हा अलंकार होतो. श्रीकृष्ण चरित्रकथेत अघासूराचे वर्णन करतांना अशीच अतिशयोक्ती जाणते. पहा...

*येकी दाडा आकाशी । येकी पसरीली भूमीसी।*
*मार्ग आणूनी लाविला मुखासी। कोंडून येर ।।७-१०२।।*
*मेरू मंदाराचे शिखर । तैसे स्थुळ ज्याचे शरीर ।*
*स्पर्धा करी अंबर । लागोनिया ।।७-१०४।।*

गोकुळात श्रीकृष्णाला मारायला आलेल्या अघासूराने आपल्या तोंडाचा प्रचंड जबडा उघडला. त्याचा वरचा भाग आकाशाला तर खालचा भूमीस लावला. मंदार पर्वताप्रमाणे प्रचंड शरीर असलेल्या अघासूराचे हे वर्णन म्हणजे अतिशयोक्तीच होय.

***६.सार :*** एखाद्या वाक्यातील कल्पना चढत्या क्रमाने मांडून उत्कर्ष किंवा अपकर्ष साधलेला असतो. तेव्हा तेथे 'सार' हा अलंकार असतो. उदा. कवी कृष्णदासांची ही ओवी पहा

*धर्म वुछादीलेया पाप होये । पापे आयुष्य विलया जाये ।*
*तेणे करोनी नरका ठाये । कल्पांतवेरी ।।४-८६।।*

अधर्माने वागून धर्माचा उच्छंद केल्याने पापाचरण होते. पापकर्मामुळे आयुष्य लयास जाते. त्याचा परिणाम मृत्यू ,त्यानंतर कल्पांता पर्यंत नरक यातना भोगाव्या लागतात. शक्ती, सत्ता, संपत्तीच्या जोरावर पूर्वायुष्यात केलेला कूकर्माची फळे काहींना 'याच देही याची डोळा' पहावी लागतात, भोगावी लागतात. 'या तना' भोगाव्या लागणाऱ्या त्यां यातना यमयातनेपेक्षा कमी नसतात.

***७. उत्प्रेक्षा :*** उपमेय हे जणू उपमानच आहे, असे जेथे वर्णिलेले असते तेथे उत्पेक्षा हा अलंकार असतो. (जणू, जणू काय, वाटे, भासे, की' यांसारखे साम्यवाचक शब्द येतात भागवत गौरव करतांना कृष्णदास म्हणतात...

*जे अटरा पुराणाचे सार। वेदांचे गव्हर ।*
*मुक्तिचे द्वार । श्रवण इंद्रीयांचे ।।१-९१।।*
*की ते सर्व रसांचे । अमृत स्वर्गभुवनीचे ।*
*इछिले पदार्थ ज्याचे । आय आता ।।९२।।*

भागवत गौरव करताना कृष्णदास शामा म्हणतात 'भागवत म्हणजे अठरा पुराणांचे सार, वेदांचे गव्हर, मुक्तीचे द्वार इतकेच नव्हे तर जणू की ते सर्व रसाचे स्वर्ग भुवनीचे जणू अमृत आहे, असे येथे वर्णिले असल्याने या ओवीत उत्प्रेक्षा हा अर्थालंकार संभवतो.

***८. अनन्वय :*** उपमेयाला दूसऱ्या कशाचीच उपमा देता येत नसेल, म्हणजे उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते. तेव्हा 'अनन्वय' अलंकार होतो, कृष्णरूपी भगवान विष्णूची स्तूती करतांना कृष्णदास कवी कृष्णाला आणखी कुणाची उपमा देण्यासारखी नसल्याचे स्पष्ट करतात. *''जो चतुर्भुज चक्रपाणी । जया वुपमा नाही कवणी ।।''* या शब्दांमधून 'या सम हा' हे कवी कृष्णदास सूचकतेने सांगतात.

***९. स्वभावोक्ती :*** एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे, त्याच्या स्वभाविक स्थितीचे किंवा हालचालीचे यथार्थ, हुबेहुब पण वैशिष्ट्यपूर्ण वर्णन हा ही भाषेचा एक अलंकार ठरतो. याला स्वभावोक्ती अलंकार म्हणतात. श्रीकृष्णकथेत कृष्णदास शामांनी कृष्ण कंस यां मुख्य चरित्रनायक व खलनायक यांचे स्वभावानुसार वर्णन केले आहेच. त्याचप्रमाणे गोपगोपिका, यशोदा, कालिया, अघासूर इत्यादींचे सुलभ स्वभाव उत्तम प्रकारे वर्णन केले आहे. त्यासाठी प्रत्यक्ष श्रीकृष्णचरित्र कथा पठण करणेच योग्य ठरेल.

***१०. व्याजस्तुती :*** बाह्यत:स्तुती पण आतून निंदा किंवा बाह्यत: निंदा आतुन स्तुती असे जेथे वर्णन असते, तेथे 'व्याजस्तुती' हा अलंकार असतो. कृष्णदास शामांनी कृष्णारी कंसाला कसा कृष्ण भक्त केले आहे पाहा...

*पण कंसाचे भाग्य थोरl जो पातला साक्षात्कारl*
*ज्या घडले होते निरंतर l ध्यान त्याचे ll१९-१३९ll*
*उठता बसता चालता l निद्रा भोजन सारिताl*
*त्याचे कृष्णावरी चित्ताl रात्रीं दिवस ll१९-१४०ll*
*जैसा ऐकिला श्रवणी l तैसा स्मरे अंतकरणीl*
*ऐके राया शिरोमणीl विष्णूरता ll१९-१४२ll*

***११. चेतनगुणोक्ती :*** निसर्गातील निर्जिव वस्तू सजीव आहेत, अशी कल्पना करून ती मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात असे जेथे वर्णन असते. तेथे चेतनगुणोक्ती हा अलंकार असतो. कृष्णदासांच्या चरित्रथेतील वनस्पती वेणू प्रसवल्या आहेत. तर कृष्णस्नेहांकिता यमुनानदी वेणूनाद ऐकण्यास आतुरली आहे.

*धन्ये या वनस्पती l झाल्या वेणूते प्रसंवतीl*
*येकाद्या सुपुत्रा होती l वंशामाजी ll१०-१००ll*
*येमुना पांगुळली ऐकोनी l पक्षी पडचाळाले गघनीl*
*मृगामागे धावत होती वनीl ती उभी राहिली ll१०-१०३ll*

अशाप्रकारे पशूपक्षी, वृक्ष लता नदी यांमध्ये मानवी चेतना व संवेदना जागृत करण्याची किमया आद्य गोमंतकीय कवी कृष्णदास शामांनी श्रीकृष्णचरित्र कथा वर्णन करतांना केली आहे.

***१२. दृष्टांत :*** एखाद्या विषयाचे वर्णन करून झाल्यानंतर ती गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिल्यास दृष्टांत अलंकार होतो. उपमेत सादृश्य दाखवितांना 'जसे, जेवी, सम, सारखा,' यांसारखे शब्द येतात. दृष्टांतात सादृश्य असते, पण ते दाखविणारे साम्यवाचक शब्द नसतात. हा या दोन अलंकारातील फरक आहे. श्रीकृष्ण चरित्र कथेत कालीया मर्दनानंतर नागस्त्रियांनी केलेल्या कृष्णस्तुतीत हा अलंकार दिसून येतो.

*तुज सज्जन वैरी सारीखे l परी ते आचरती तुकेl*
*त्याही केले सारीखे l फळलासी देवू ll९.१०४ll*
*ज्याची जैसी भावना l बरवी इच्छिले कोडा l*
*ते दिसो लागले पुढां l तयां लावी ll१०५ ll*
*आणिक एक देवा l या कार्या घडली तुझी शेवा l*
*ऐसे आमच्या जीवा l आले सकळ ll१०७ll*

***१३. पर्यायोक्त :*** एखादी अमंगल गोष्ट सरळ शब्दात न सांगता ती अप्रत्यक्ष रीतीने अडवळणाने सांगणे, यास पर्यायोक्त असे म्हणतात. उदा. सत्ताधारी पक्षाचा 'उध्दार' करण्यातच विरोधी पक्षनेते धन्यता मानतात. (म्हणजे ते त्यांना दोष देतात) 'शबराने कृष्णावर बाण मारून त्याची हत्या केली.' असे न म्हणता, 'श्रीकृष्णाने आपले अवतार कार्य संपवले.' असे आपण म्हणतो. त्याप्रमाणे श्रीकृष्ण कथेत श्रीकृष्णाने पूतना, अगासूर यांना ठार मारले. त्यांची हत्या केली. 'पर्यायोक्त' या अलंकाराने कवीने हे वर्णन कसे केले आहे पहा...

*येरू समरथाचा समर्थू l उरी बैसला लक्ष्मीकांतू ll*
*दियावेया मुक्तीपंथू l पूतने तिया ll५-४९ll*
*मुक्ति दिधली अगासूरा ll७-१४९ll*

***१४. विरोधाभास :*** वियोगार्थ मीलन होते, मरणात खरोखर जग जगते; अशा प्रकारे एखाद्या विधानात वरवर दिसायला विरोध आहे असे वाटते, पण वास्तविक तसा विरोध नसतो. अशा ठिकाणी 'विरोधाभास' हा अलंकार असतो. कृष्ण कथेत भयभीत झालेल्या मथुरा नरेश कंसाच्या वर्णनात हा विरोधभास दिसून येतो. कवी वर्णन करतात.

*बहेरी स्वरूपे नटला । परी भितरी असे वाळला ।*
*काळाचेनी घावे गेला । मरोनिया ।।१८-१२४।।*

***१५. अन्योक्ती :*** या अलंकारात कवी ज्याला बोलायचे त्याच्या बद्दल न बोलता इतरांना उद्देशून बोलत असतो. कृष्णकथाकाव्यात अशा अनेक ओव्या आहेत. ज्या कृष्ण कालीन पात्रांच्या निमित्ताने कवीकालिन समाजाला उद्देशून उपदेशील्या आहेत. उदा. देवकीच्या हत्तेस सज्ज झालेल्या कंसाला वसुदेव म्हणतो.

*विवेकु न धरीता शरीरी । जो कार्या लागी आरंभ करी।*
*तो दु:ख वावे संसारी । अैसे वडील बोलती ।।२.१६।।*

**उपदेशांचे समाजावर झालेले परिणाम**

संत एकनाथ आपल्या ग्रंथात समाजातील विविध बलस्थानांचा अवर्जून उल्लेख करतात. कृष्ण-उध्दव, नारद-व्यास, परिक्षित-शुक इत्यादिंच्या संवादातून प्रश्नोत्तरांच्या माध्यमाने नाथ सहज सुलभ पध्दतीनी समाज प्रबोधनाचे कार्य करतात. राजा कसा असावा? श्री गुरु कसा असावा ? पती कसा असावा? पत्नी कशी असावी? द्रव्याचा व्यवहार कसा करावा? सामाजिक रिती-रिवाज, वैयक्तिक व्रत, कौटुंबिक सण, सामाजिक उत्सव कसे असावेत? कसे असू नये. लोकांच्या श्रध्दा-अंधश्रध्दा यांतील साम्य, भेद, धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरुषार्थांचे विवरण तसेच काम क्रोध मद मत्सर दंभ आणि अहंकार या सहा विकारांचे नियंत्रण, अध्यात्म शास्त्र, प्रपंच आणि परमार्थ अशा संकल्पनांची चर्चा सुलभ भाषेत ते करतात. यामुळे नाथांचा एकनाथी भागवत हा ग्रंथ वारकऱ्यांच्या भागवत धर्माचा अढळ मजबूत मुलाधार ठरला आहे.

कृष्णदास शामानी आपल्या ग्रंथातून जनोपदेश केला आहे तो नाथांच्या भागवताच्या तुलनेत खुपच मर्यादित आहे. ज्या पध्द तीने नाथांचा ग्रंथ वारकरी संप्रदायांनी आपला जीवनाधार मानला तसा श्रीकृष्णचरित्र कथा समाजाने स्वीकारल्याचे दिसून येत नाही. याचे हे ही कारण असू शकते. तत्कालीन समाजजीवन, साहित्यिकाचे जीवनानुभव यांचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यातून साहजिकपणे उमटत असते. दोन्ही ग्रंथामधून हे दिसून येते.

**दोन्ही ग्रंथातील सामाजीक राजकीय साद-पडसाद**

मुस्लिम अमदानीच्या धार्मिक आक्रमणाच्या काळात ज्ञानेश्वर परंपरेचे पुनरूज्जीवन करतातना नाथांना अनेक बाबतीत समन्वय बुध्दीचा अवलंब करावा लागला. कर्मप्रधान वैदिक धर्म आणि भक्तिप्रधान भागवद् धर्म या दोहोंचा मेळ घालण्यासाठी गीतेऐवजी त्यांनी श्रीमद्‌भागवताच्या अकराव्या स्कंधाची निवड केली. भगवद्‌गीता प्राधान्याने आध्यात्म बोध करणारी आहे, तर भागवतात कर्माकर्माचा, विधिनिषेधांचा विचार मांडला आहे. नाथांच्या काळात धर्मप्रवृत्तीच्या जोपासनेसाठी देवांचे उत्सव, यात्रा, जत्रा, सणवार आणि दैनंदिन पूजा-अर्चा इत्यादींनी महत्व देणे आवश्यक होते. त्यामुळे कथा प्रधान 'उध्दवगीतेचा' म्हणजेच भागवताच्या अकराव्या स्कंधाचा आदर करण्याची समयोचिता नाथानी दाखवली. मात्र देवादिकांच्या निमित्ताने करावयाची धर्मकृत्ये केवळ कर्तव्य भावनेने, रूक्ष वृत्तीने केली जाऊ नयेत. तर त्याच्या पाठीशी भक्तिचा जीव्हाळा हवा, हेही नाथांनी सूचवले आहे. नाथांच्या या ग्रंथात समाजातील दांभिक भक्तांचेही वर्णन दिसते. उदा.

*लोभे खावया आपण । ठेवी प्रतिमेपुढे पक्वान्न ।।*
*अतित आलिया न घाली अन्न । मदर्चन ते नव्हे ।।* (अ.११ओवी २१४)

जन सामान्यांना नाथांनी जसा उपदेश केला तसा परचक्रापासून जनतेचे आपण रक्षण करावे असा संदेशही नाथांनी दिलेला दिसून येतो. '*सर्वाचे आपत्तीत रक्षण । राये करावे आपण ।।*' अ.१७.४४४. या ओवीनुसार नाथांनी तत्कालीन समाजहीतासाठी क्षात्रधर्माचाही पुरस्कार केल्याचे जाणवते. इतकेच नव्हे तर नाथांनीही आपण ब्राह्मण असून सुध्दा शत्रू सैन्याचा सामना करण्यासाठी हातात तलवार घेवून युध्द केले. ब्राह्मणांनी त्या काळात शस्त्र घेणे पाप समजले जायचे. या विषयी नाथ लिहितां.

*ब्राह्मणासी हिंसाकर्म । तो जाणवा अधर्म ।*
*आगल्या अनुपत्ती दुर्गम। तै क्षात्र धर्म करावा ।।१७-४५५।।*

अशा प्रकारे एकनाथी भागवतात सामाजिक राजकीय घटनांचे पडसाद दिसून येते. नाथांनी जितक्या उत्कटपणे हे मांडले आहे. तसे कृष्णदास शामांच्या श्रीकृष्णचरित्रकथा या ग्रंथात आढळत नाही.

कृष्णदासांनी इ.स.१५२६या काळात ग्रंथ रचना केली. त्या काळात गोव्यात अदिलशहाची सत्ता होती. त्याचे पडसाद त्यांच्या ग्रंथात उमटलेले दिसत नाही. सामाजीक विषय मात्र या ग्रंथकाराने कुशलतेने हाताळले आहेत. श्रीकृष्णाची रासलीला वर्णन करतांना या

चतूर साहित्तीकाने सामाजिक भान ठेवले आहे. गोवर्धन उचलणाऱ्या श्रीकृष्णालाच अनेक गोपीकां बरोबर रासलीला करणे शोभते. इतरांनी ती करण्याच्या भानगडीत पडू नये, असेच कवीं सुचवतात...

*कृष्णे गोंवर्धनू वुचलीला । हे आणिका केले न वचे ।*
*करणे समर्थाचे म्हणोनी आपणे काये त्याचे । घेऊ नये ।।१४-१३१।।*

रसिक श्रोत्यांच्या मनात बौध्दिक प्रदूषण होऊ नये, याची ग्रंथकाराने अशा ओव्यांच्या माध्यमाने दक्षता घेतली आहे. त्याचबरोबर समाजातील समाज जीवनाचे साद पडसादही कमी जास्त प्रमाणात दिसून येते. कृष्णचरित्रकार आपल्या ग्रंथात समाजातील पतीपत्नींच्या भवजीवनाला सहज मार्मिकपणे स्पर्श करतांना पुढील ओवीत दिसतात.

*आपली स्त्री कुरूपता । तेची मानावी पतीव्रता ।*
*आणिकाची बरवी म्हणोनी घेता । प्राणू जावे ।।४-१०।।*

दरिद्री माणसाला अचानक द्रव्य प्राप्ती झाल्यावर त्याच्या वृत्तीत कशाप्रकारे बदल घडतो हे कृष्णदासानी

*दरिद्रीया आली संपत्ती । तो न लेखी कवणा अंती ।।*
*तैसी मर्यादा मोडूनी चालती। नदी सकळ ।।* या ओवीतून स्पष्ट केले आहे.
*लोक संग्रहा कारणे । बरवे कार्य आचरणे ।।*
*सत्मार्गी प्रवर्तणे । पुरुष श्रेष्ट ।।१४-११४।।*

या ओवीतील प्रत्येक शब्द अर्थपूर्ण आहे. लोकांना संघटीत करून ते संघटन टिकवणं सोपं नसतं. पण सत्कर्माचे आचरण करून इतरांनाही सन्मार्गी लावणारे महापुरुष हे कार्य सहज करू शकतात. शांत, सहनशील चातुर्य, हेच तर महापुरुषांचे सदूगुण वैभव आहे. ज्यांच्या आधारे ते इतरांची मनं सहज जिंकू शकतात.अशा ओव्यांमधून अनेक ठिकाणी ग्रंथकारांनी कथा आशयानुसार समयोचित सुभाषितांची पेरणी केली आहे. देवूले, आदळले अशा गोमंतकीय शब्दांनाही कृष्णदास शामांनी आपल्या ग्रंथात स्थान दिले आहे.

प्रा. विनय मडगांवकर, शिवोली गोवा.
संपर्क: ८३०८४७७६६४
vinaymadgaonkar@gmail.com

**संदर्भ सूची**

१. श्रीमद्‌भागवत (मुळ संस्कृत ग्रंथ)
२. (जीवनमुक्त मठ ग्रंथालयात उपलब्ध)
३. चैतन्य भागवत
४. मराठी भगवद् गीता
५. मराठी विश्वचरित्र कोश
६. संपादक : श्रीराम पांडुरंग कामत
७. पाच संतकवी - शं.गो. तुळपुळे
८. एकनाथी भागवताचा अभ्यास - द.वि. कुलकर्णी
९. एकनाथ दर्शन - श्री घाटे